# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र.१ जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई ४०० ००५ **दूरध्वनी २२१६ ३९६४/२२१६ ३९६५**
**ई-मेल : mercindia@merc.gov.in**
**संकेत- स्थळ: www.merc.gov.in**


MERC

**जाहिरात क्र. ३५/२०२४-२५**

## जाहीर सूचना

## प्रारुप विनियमांवर अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागविण्याबाबत

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मविनिआ किंवा आयोग) खालील प्रारुप विनियम तयार केले आहेत;

१) प्रारुप मविनिआ (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) (पहिली सुधारणा) विनियम, २०२४

२) प्रारुप मविनिआ (ग्रीडला जोडलेली परस्पर-सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा) (दुसरी सुधारणा) विनियम, २०२४

२. हे प्रारुप विनियम त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह, आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत.

३. प्रारुप सुधारणा विनियमांवरील अभिप्राय, सूचना किंवा हरकती आयोगाच्या **(www.merc.gov.in/e-public-consultation)** संकेत-स्थळावरील **'E-public Consultation'** या टॅबद्वारे या सूचनेच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत अपलोड करता येतील. या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान **मोबाईल क्र.** ८९२८०७१५२२ वर किंवा **suggestions@merc.gov.in** या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात. **'E-public consultation'** या टॅबवर सूचना आणि हरकतीअपलोड केलेल्या व्यक्तीस त्यांच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत, आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५ या पत्यावर **दि. १४ जून, २०२४** रोजी सायंकाळी ५.०० पूर्वी दाखल करावी. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना / हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

४. **दि.१४ जून, २०२४ रोजी** किंवा त्याआधी अपलोड केलेले किंवा प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती प्रारुप विनियमांना अंतिम स्वरुप देण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील. या विषयावरील पुढील सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळाच्या माध्यमातूनच होईल.

**सही/-**
**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
**सचिव, मविनिआ**

दिनांक : २३/०५/२०२४
ठिकाण : मुंबई